प्लास्टिक तसेच थर्माकॉल उत्पादनांवर बंदीच्या अनुषांगाने राज्यात पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती अभियान राबविण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत..........

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. प्लास्टिक २०१९/प्र.क्र.२३०/तां.क.१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं - २०१९/प्र.क्र. ४४/अर्थ- ३, दि. ०१.०४.२०१९
२. शासन अधिसूचना क्र. प्लास्टिक २०१८/प्र.क्र.९७/तां. क.१/दि. २३.०३.२०१८
३. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. आर.ओ.सी. २०१८-१९/क्र-५/C१२ दिनांक ६/४/२०१८.
४. वित्त विभाग - शा. परि. क्रमांक - अर्थसं - २०१९/प्र.क्र.९२/अर्थ - ३,दि. ०८/०७/२०१९
५. समक्रमांक दिनांक २९ जुलै, २०१९ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत असून, सुधारित शासन निर्णय पुढीलप्रमाणे आहे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) कायदा २००६ च्या कलम २ व कलम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत संपूर्ण राज्यात प्लास्टिक तसेच थर्माकॉल उत्पादनांवर जनजागृती मोहिम राबिवणे आवश्यक आहे. सदरहू जनजागृती मोहिम राबविताना विविध प्रसिध्दी माध्यमांचा वापर करावा लागणार आहे. त्यानुषांगाने या प्रयोजनार्थ अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

प्लास्टिक तसेच थर्माकॉल बंदीबाबत नागरिकांना जनजागृती करण्यासंदर्भात सदर कार्यक्रमांची प्रसिध्दी विविध माध्यमाद्वारे करण्यासाठी रुपये १० कोटीच्या मर्यादेत विस्तृत माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेली आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने तयार केलेल्या माध्यम आराखडयानुसार जाहीरातदार संस्थेस प्रसिध्दीसंबंधीचे कायादेश माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने उपरोक्त संदर्भ क्र.३ अ अन्वये निर्गमित केलेले आहे. यातंर्गत प्रसारणाबाबतचे जाहिरातीचे देयके, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना पाठविण्याचे निर्देशित केलेले आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या उपरोक्त कार्यादेशाच्या अनुषंगाने १,३६,४१६/-रुपये इतका निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदरहू निधीचे वितरण सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण

नियंत्रण मंडळ यांना करण्यात येत आहे. यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या नावे रुपये १,३६,४१६/- एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी प्राप्त झालेल्या देयकाच्या अनुषंगाने प्रसिध्दीचे काम उपरोक्त नियोजनाप्रमाणे झालेले आहे. याबाबतची खातरजमा केल्यानांतर देयके अदा करण्याची कार्यवाही करावी.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक यु - ४,३४३५ परिस्थितीकी व पर्यावरण, (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५१३०२) या मुख्यालेखा शिर्षाखालील सन २०१९-२० मधील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा."

३. सदर प्रकरणी होणाऱ्या खर्चाच्या जिल्हानिहाय तपशिलासह उपयोगिता प्रमाणपत्र विहीत कालमर्यादेत शासनास प्राप्त होतील याची दक्षता सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं.-२०१९ प्र क्र ९२ अर्थ - ३, दिनांक ०८ जुलै, २०१९ मधील परिच्छेद क्र. ४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१९/प्र क्र ९२/ अर्थ - ३. दिनांक ८ जुलै, २०१९ मधील परि. क्र ७ ते ९ मधील सर्व अटीची पूर्तता होत आहे.

याशिवाय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक अर्थसं २०१९/प्र क्र ९२/अर्थ -३, दिनांक ८ जुलै, २०१९ मधील परि क्र. ८ ते १० मधील सर्व अटीची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०९१५१८४४२७०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manohar
Ramchandra
Bandpatte

Digitally signed by Manohar Ramchandra Bandpatte
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb60e1f4b73938805c04b06f5c0907864cb639223a53ce540f9ce8e8e6593e5d, serialNumber=bb7b9a28cd6d8e2b1fa8f60d210258464e6ece204d02617fbb7ed6be3db6752c, cn=Manohar Ramchandra Bandpatte
Date: 2019.09.09 15:27:09 +05'30'

(मनोहर बंदपट्टे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

२. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.

३. संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

४. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५. महालेखापाल १/२ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

६. संचालक लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७. निवड नस्ती.